श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संचालित
भ. क. ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे

# श्रीक्षेत्र डेरवण वार्तापत्र

जानेवारी २०२३ | वर्ष-११, विशेषांक | विनामूल्य खासगी वितरणासाठी | मासिक, पाने ८

## जागतिक कीर्तीचे पुरातत्त्वशास्त्रज्ञ डॉ. शरद नरहर राजगुरू यांना भावपूर्ण श्रद्धांजली !



ज्येष्ठ भूवैज्ञानिक, जागतिक कीर्तीचे पुरातत्त्वशास्त्रज्ञ, डेक्कन कॉलेजचे माजी प्राध्यापक आणि सहसंचालक डॉ. शरद नरहर राजगुरू यांचे दि. १४ डिसेंबर २०२२ रोजी पुण्यातील त्यांच्या राहत्या घरी वृद्धापकाळामुळे निधन झाले. २६ नोव्हेंबर १९३३ रोजी जन्मलेल्या डॉ. राजगुरूंनी नव्वदाव्या वर्षात नुकतेच पदार्पण केले होते. १९६० साली डेक्कन कॉलेजात पुरातत्त्व विभागात व्याख्याता म्हणून आपल्या कारकिर्दीची सुरुवात करणारे

राजगुरू सर अगदी शेवटपर्यंत आपल्या विषयात अध्ययन, संशोधन करणाऱ्या आपल्या विद्यार्थ्यांना उत्साहाने मार्गदर्शन करीत होते आणि त्याच वेळी त्यांचे स्वत:चे संशोधनही अखेरपर्यंत सुरूच होते. ६०-६२ वर्षांच्या आपल्या संशोधन आणि अध्यापनाच्या कार्यात त्यांनी बौद्धिक क्षेत्रात केवढा नामवंतांचा गोतावळा जमा केला आहे याचा प्रत्यय त्यांच्या अंत्ययात्रेला विविध ज्ञानशाखांमधील विद्वज्जनांच्या उपस्थितीवरून प्रकर्षाने येत होता.

सरांनी भूशास्त्र (जिऑलॉजी) विषयात १९५५ साली पदवी प्राप्त केली आणि १९५७ साली पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले. या काळात घरची आर्थिक स्थिती बेतासबात असल्यामुळे भांडारकर इन्स्टिट्युटमध्ये अर्धवेळ नोकरी करून त्यांनी हे शिक्षण पूर्ण केले. मनात शिक्षण क्षेत्रात काम करावे अशी इच्छा होती पण परिस्थितीच्या दबावामुळे अर्थार्जन ही निकडीची गरज असल्यामुळे सुरुवातीला दोन-तीन ठिकाणी नोकऱ्या केल्या. या सगळ्यात कोठेच मन रमेना म्हणून वर्ध्याला गांधी आश्रमातही जाऊन राहिले. पण तेथील गद्रे नावाच्या एका गृहस्थांनी त्यांना सांगितले की हे तुझे क्षेत्र नव्हे. तुझ्या व्यासंगाच्या विषयातच चांगले काम कर. तीच तुझी देशभक्ती ठरेल.

१९५८ साली त्यांनी पुण्यात परत येऊन 'गोदावरी खोऱ्यातील पुरातत्त्व आणि पर्यावरणीय पुरातत्त्व' या विषयावर संशोधनाला सुरुवात केली आणि त्याच वेळी १९६० साली ते डेक्कन कॉलेजात प्रो. सांकलिया यांच्या आग्रहावरून पुरातत्त्व विभागात व्याख्याता म्हणून रुजू झाले. त्या वेळी सांकलियांच्या अन्य तीन विद्यार्थ्यांनी पीएच. डी. पूर्ण केली होती. पण राजगुरूंची नेमणूक करण्यामागे सांकलियांचा राजगुरूसरांच्या क्षमतेवरील ठाम विश्वासच दिसतो. डेक्कन कॉलेजात रुजू झाल्यावर त्यांनी पुन्हा आपल्या संशोधनाला सुरुवात केली, मात्र आता 'भीमा नदीच्या खोऱ्यातील मुळा-मुठा नदी प्रणालीच्या भूपुरातत्त्वीय इतिहासा'वर त्यांनी अभ्यास सुरू केला. यासाठी त्यांनी या नद्यांच्या उगमापासून त्या भीमेला मिळेपर्यंतच्या प्रदेशाचा पायी प्रवास केला. काठाला साठलेल्या गाळाच्या थरांचा अगदी कसून अभ्यास त्यांनी केला. या अभ्यासाच्या काळात महाराष्ट्रातील दुष्काळ आणि एकंदरीतच पुरापर्यावरण या विषयाकडे त्यांचे लक्ष वेधले आणि नंतर त्यांनी आपल्या विद्यार्थ्यांसह या विषयाचा अखंड वेध घेतला.

महाराष्ट्रातील दुष्काळाचा मागोवा, आदिमानवाच्या काळातील पर्यावरण, नद्यातील गाळातील पुराव्यांवरून प्राचीन काळात महाराष्ट्रातील आणि बाहेरील पर्जन्यमानात झालेला बदल आदी विषयांवर संशोधन करणारी डॉ. शीला मिश्रा, डॉ. सुषमा देव, डॉ. विश्वास काळे, डॉ. सविता घाटे, डॉ. हेमा अच्युतन, डॉ. शांती पप्पू आदी संशोधकांची एक फळीच त्यांनी उभी केली. संपूर्ण भारतात काश्मीर ते कन्याकुमारी - सगळ्या प्रांतातून त्यांचे विद्यार्थी आपापल्या क्षेत्रात झटून काहीतरी करीत आहेत. त्यामुळे भारतातील नद्यांचा एका नव्या दृष्टिकोनातून अभ्यास झाला आणि सुमारे तीन लाख वर्षांतील पर्यावरणीय बदलांचा समग्र इतिहास जगापुढे आला.

डेक्कन कॉलेजात कार्यरत असताना त्यांनी दक्षिण पठारी नद्या; सौराष्ट्र, गुजरात, राजस्थान, केरळ, तामिळनाडूचा किनारा; आसाम मणिपूर, नर्मदेचे खोरे, गारो टेकड्या, कोकण, पश्चिम बंगाल, काश्मीर असं जवळजवळ संपूर्ण देशभर भूपुरातत्त्वीय घडामोडींवर संशोधन आणि समन्वेषण केलं. महाराष्ट्रातील नेवासा, इनामगाव, वाळकी; राजस्थानातील दिदवाना व बालाथल; सौराष्ट्रातील कुंतासी व पाद्री, मध्यप्रदेशातील समनापूर, कर्नाटकातील हुंसगी येथील उत्खननात भूपुरातत्त्वज्ञ म्हणून मोठी कामगिरी बजावली. भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभाग तसेच अनेक विद्यापीठांतर्फे होणाऱ्या उत्खननांमध्ये त्यांना तज्ज्ञ सल्लागार म्हणून निमंत्रित केले जात असे. १९७४ साली तर त्यांना ऑस्ट्रेलियात संशोधन मोहिमेत सहभागी होण्याचा बहुमान मिळाला. कॅनबरा स्थित ऑस्ट्रेलियन नॅशनल युनिव्हर्सिटीत जैविक भूगोल आणि भूरचना विज्ञान



फोटो : डॉ. जयेन्द्र जोगळेकर

विभागात व्हिजिटिंग फेलो म्हणून त्यांनी प्रो. जिम बाउलर यांच्यासोबत एक वर्ष काम केले. या वेळी केलेल्या उत्खननात ४०,००० वर्षांपूर्वीच्या मानवी सांगाड्याचा शोध लागला. तो 'मंगो मॅन' या नावाने ओळखला जातो. त्यामुळे हे संशोधन फारच महत्त्वाचे मानले जाते.

सरांची कामावर असणारी निष्ठा दाखविणारा एक प्रसंग त्यांची विद्यार्थिनी डॉ. सविता घाटे यांनी सांगितला आहे. पाक सीमेपासून केवळ २५ किलोमीटर अंतरावरील धोरीमना या ठिकाणी एका ५० मीटर खोल, चिंचोळ्या विहिरीत वाळूचे नमुने घेण्यासाठी ते स्वत: एका मध्यम आकाराच्या बादलीत बसून उतरले होते.

'सेंट्रल ॲरिड झोन रिसर्च इन्स्टिट्युट' या संस्थेच्या सहकार्याने 'वाळवंटांची निर्मिती आणि प्रसार' या विषयावर त्यांनी मोठे संशोधन केले. राजस्थान आणि कच्छच्या वाळवंटांचा अभ्यास करून त्यांनी प्रसिद्ध केलेल्या अनेक शोधनिबंधांमुळे त्यांना वाळवंट संशोधक म्हणून मान्यता मिळाली आणि अनेक देशांनी आपल्या वाळवंटांचे क्षेत्र परीक्षण करण्यासाठी आणि सल्ला देण्यासाठी सन्मानाने निमंत्रित केले.

राजगुरू सरांनी आपल्या संशोधनाच्या निमित्ताने अनेक देशात प्रवास केला आहे. इराक, इराण, जॉर्डन, बांगलादेश, इस्राएल, ऑस्ट्रेलिया, चीन, जपान, अमेरिका, फ्रान्स, नेपाळ, कॅनडा अशा अनेक देशात गेल्यावर तेथील समाजजीवन आणि त्यांची संस्कृती, त्यांची मानसिकता याविषयीही त्यांनी बारकाईने निरीक्षणे केली.

सरांनी सागर किनाऱ्यावर स्थिरावलेल्या वाळूच्या टेकड्यांवर संशोधन करून पूर्वी सागराची पातळी कोठवर होती, महाराष्ट्राच्या सागर किनारी माणसाचे वास्तव्य किती जुने आहे आदी बाबींवर प्रकाशझोत टाकला. कुकडी नदीत सापडलेली राख ही इंडोनेशियातील 'टोबा' या ज्वालामुखीच्या उद्रेकातील आहे हा त्यांचा आपल्या विद्यार्थ्यांबरोबर संशोधन करून काढलेला निष्कर्ष जगभर गाजला. तसेच त्या राखेतच अश्मयुगीन हत्यारे सापडल्यामुळे भारतातील मानवी अस्तित्वाचे प्राचीनत्व अधोरेखित झाले. महाराष्ट्राप्रमाणेच भारताच्या इशान्य सीमाभागातही त्यांनी आपल्या विद्यार्थ्यांसह संशोधन करून त्या भागाचा भूपुरातत्त्वीय इतिहास समोर आणला.

सरांनी ज्याप्रमाणे डेक्कन कॉलेजच्या आपल्या विद्यार्थ्यांना आणि प्रकल्पांना मार्गदर्शन केले त्याप्रमाणेच त्यांनी अन्य संशोधकांना, विद्यापीठांना, आपल्या सहकाऱ्यांच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले आणि त्यांच्या क्षेत्रीय परीक्षणांमध्ये भाग घेतला. 'त्यामुळे मला नवा प्रदेश पाहायला मिळतो, माझ्याही ज्ञानात भर पडते आणि दुसऱ्याला मदत करण्याचे समाधानही मिळते' अशी यामागची त्यांची भूमिका असे. पुणे विद्यापीठाबरोबरच आघारकर रिसर्च इन्स्टिट्यूट, वाडिया इन्स्टिट्यूट ऑफ हिमालयन जिओलॉजी, फिजिकल रिसर्च लॅबॉरेटरी, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ जिओमॅग्नेटिझम या भारतातल्या संशोधन क्षेत्रातल्या अग्रगण्य संस्थांतल्या शास्त्रज्ञांसोबत आणि अनेक परदेशस्थित संशोधकांसोबत वेगवेगळ्या अनुषंगाने भारतभरातले क्वाटर्नरी भूभाग आणि त्यांचा मानवाने केलेला वापर यावर सर काम करत राहिले. हातचे राखून न ठेवता दुसऱ्याला मदत करण्याच्या त्यांच्या स्वभावाबरोबरच दुसऱ्याचे म्हणणे शांतपणे ऐकून घेणे आणि ते पटले तर मोकळेपणाने स्वीकारणे या त्यांच्या गुणांमुळे त्यांनी असंख्य माणसे आपल्या परिवारात जोडली.

सरांचा स्वभाव हा प्रसिद्धीपराङ्मुख असल्यामुळे त्यांच्या मोठेपणाची सर्वसामान्यांना, अगदी पुण्यात ते

राहत असलेल्या भागातील लोकांनाही फारशी कल्पना नाही. पण ते भारतातील आद्य भूपुरातत्त्वज्ञांपैकी एक होते. त्यांच्या संशोधनाला जगभर मान्यता मिळालेली आहे. 'पुरापर्यावरण' म्हणजे प्राचीन काळातील पर्यावरण या विषयात त्यांनी आपल्या विद्यार्थ्यांबरोबर केलेल्या कामाचे फार मोठे महत्त्व आहे. त्यातील बरेच संशोधन हे महाराष्ट्राशी निगडित आहे. त्यांच्या कामाचे मोल लक्षात घेऊन त्यांना अनेक प्रकारे अनेक संस्थांकडून सन्मानित करण्यात आले .

१. अध्यक्ष, इंडियन सोसायटी फॉर प्री–हिस्ट्री अ‍ॅन्ड क्वॉटर्नरी स्टडीज, १९८२
२. संशोधन सल्लागार समिती सदस्य : वाडिया इन्स्टिट्यूट ऑफ हिमालयन जिऑलॉजी, डेहराडून, १९८२ ते १९८८
३. भारतातील पुराहवामान संशोधन समिती सदस्य, डिपार्टमेंट ऑफ सायन्स अ‍ॅन्ड टेक्नॉलॉजी, दिल्ली १९८८–८९
४. फेलोशिप : ऑस्ट्रेलियन नॅशनल युनिव्हर्सिटी, कॅनबरा, १९७४ आणि नॅशनल अ‍ॅकॅडमी ऑफ सायन्सेस, अलाहाबाद, १९९०
५. लाइफटाइम फेलोशिप : इंटरनॅशनल युनियन फॉर क्वाटर्नरी रीसर्च, २०११
६. एशियाटिक सोसायटी, प. बंगालचे सुवर्ण पदक, २००५ (या पदकाने आजवर महाराष्ट्रात फक्त दोघांना सन्मानित करण्यात आलेले आहे. एक, डॉ. जयंत नारळीकर आणि दुसरे म्हणजे डॉ. राजगुरू)



फोटो : डॉ. चारुता कुलकर्णी

त्यांचे १५० पेक्षा जास्त शोधनिबंध प्रसिद्ध झालेले आहेत. त्यातील सुमारे ४० निबंध हे निवृत्तीनंतर प्रसिद्ध झाले आहेत. त्याचप्रमाणे पूर्ण केलेल्या सात प्रकल्पांमधील चार प्रकल्प त्यांनी निवृत्तीकाळात पूर्ण केले. त्यांच्या सुमारे वीस विद्यार्थ्यांनी त्यांच्या मार्गदर्शनाखाली पीएच. डी. मिळविली आहे.

सर अगदी अखेरपर्यंत कार्यरत होते. त्यांनी आणि डॉ. सुषमा देव मॅडमनी मिळून २०१९मध्ये पुणे आकाशवाणीवर 'खुले आकाश' या कार्यक्रमामध्ये महाराष्ट्राचा आद्य इतिहास शालेय मुलांना समजेल अशा भाषेत उलगडून सांगितला. मुळा–मुठा हा त्यांचा पीएच. डी.चा विषय. जेव्हा दूरवरचा प्रवास करणे तब्येतीमुळे त्रासदायक होऊ लागले तेव्हा शेवटची काही वर्षे त्यांनी आपले मुळा–मुठेवरील संशोधन पुन्हा सुरू करून काही अनुत्तरीत प्रश्नांचा मागोवा घेणे पुन्हा सुरू केले. गावातील पेठांपासून ते अगदी बंडगार्डनपर्यंत कोठेही नव्या इमारतीच्या पायासाठी खोदकाम सुरू झाले की सर तेथे जाऊन आपल्या अनुत्तरीत प्रश्नांची उत्तरे शोधू लागत. सप्टेंबर २०२२मध्ये, म्हणजे साधारण तीन महिन्यांपूर्वी त्यांना भेटायला आलेल्या डॉ. चारुता कुलकर्णी या आपल्या विद्यार्थिनीला पुण्यातील या नव्या संशोधनावरील शोधनिबंधाबद्दल माहिती देतानाच त्याचा अ‍ॅब्स्ट्रॅक्ट वाचून दाखविला. एवढेच नव्हे तर, 'आता मी मिळालेल्या या बोनस वेळेचा उपयोग करून बंगालवर काही लिहिणार आहे!' असेही सांगितले.

अनेक विद्यार्थ्यांची जीवने उजळून टाकणारी अशी ही ज्ञानज्योत बुधवार दि. १४ डिसेंबर २०२२ रोजी रात्री आपल्या निवासस्थानी शांतपणे मालवली! हा एका युगाचाच अस्त होता. ईश्वर या आधुनिक काळातील ऋषितुल्य तपस्व्याला सद्गती देओ!

**डॉ. शरदराव राजगुरू आणि सद्गुरू श्रीबाबामहाराज सहस्रबुद्धे – जीवनकहाणीतील एक अनोखे पर्व :**

डॉ. शरदराव राजगुरूंचे कुटुंब आणि श्रीबाबामहाराज सहस्रबुद्धे हे नारायण पेठेतील एकाच धुमाळवाड्यात राहायला होते. त्या वाड्यातील सगळेच भाडेकरू हे सामान्य आर्थिक स्थितीतील पण एकमेकांशी जिव्हाळ्याने वागणारे. दोन खोल्यात राहणाऱ्या राजगुरू कुटुंबातील शरदराव अगदी लहानपणापासूनच श्रीबाबांच्या ५-६ खोल्यांच्या मोठ्या जागेत खेळत, बागडत मोठे झाले. श्रीबाबांच्या धर्मपत्नी सौ. दुर्गाताई आईसाहेब आणि श्रीबाबांची एकुलती एक लाडकी मुलगी चिमाताई शरदरावांचे खूप लाड करीत. श्रीबाबा आणि चिमाताई शरदरावांजवळ नेहमी 'बीडकर मठात दर्शनाला जाऊन आलास की नाही?' याची चौकशी करायचे. गोरेपान, सहा फूट उंच, भव्य देहयष्टी असलेल्या बाबांबद्दल शरदरावांना आदरयुक्त दरारा वाटायचा आणि ते नेहमी गोळ्या, खाऊ देत म्हणून प्रेमही वाटायचे. शिवाय बाबांच्या सिगरेटच्या पाकिटातील 'चांदी'ही त्यांना हवी असायची. बाबा कधीही रागवत, ओरडत नसत. एक गमतीचा भाग असा की शरदराव नेहमी श्रीबाबांना 'अहो बंडू!' असे संबोधित असत. अगदी अखेरच्या काळातही बाबांचा उल्लेख ते 'बंडू' असाच करीत. 'बंडूच माझे रक्षण करतील!' असेच ते शेवटी वारंवार म्हणत असत.

चिमाताई लग्न होऊन सासरी गेल्या, दुर्गाताईंचे निर्वाण झाले आणि मग श्रीबाबा एकटेच राहत असत. त्याच काळात श्रीबाबांची महती पटून त्यांच्याकडे दर्शनाला येणाऱ्या लोकांची संख्या वाढू लागली. मोठमोठे लोक बाबांकडे येऊ लागले. वाढत्या वयाबरोबर राजगुरूंनाही त्यांच्यातील 'वेगळेपणा'ची जाणीव होऊ लागली होती.

धुमाळवाड्यात कोणी आजारी पडले की त्याला पाहण्यासाठी श्रीबाबांना बोलावले जाई. बाबा जाऊन आले की त्या माणसाला बरे वाटे. काही जणांना भेटायला जाण्याचे श्रीबाबा टाळत. अशा वेळी त्या माणसाचे आयुष्य संपत आलेले असायचे असा शरदरावांचा अनुभव होता. शरदराव एकदा पोहताना जखमी झाले होते. सूर मारल्यावर तोंडावर आपटल्यामुळे दोन दात पडले आणि रक्तस्राव सुरू झाला. तो बराच वेळ थांबेना. शरदरावांच्या आईने शेवटी बाबांना बोलावून नेले. बाबा येऊन म्हणाले, 'शऱ्या, झोपून काय राहिलास? उठ, उद्यापासून झोपायचे नाही!' आणि त्यानंतर रक्तस्राव आश्चर्यकारकपणे थांबला.

एखादे कठीण गणित सुटले नाही तर शरदराव ते बाबांकडे घेऊन जायचे आणि बाबा ते चटकन सोडवून द्यायचे. व्याकरण असो, शब्दाचे स्पेलिंग असो, बाबा ते अचूक सांगायचे. आपल्या शिक्षणक्षेत्रातील कारकिर्दीचा पाया श्रीबाबांनी घातलेला आहे आणि त्यामुळेच आपण त्या क्षेत्रात काही बरे काम करू शकलो असे त्यांना वाटत असे. शरदराव १९५३ साली बी. एस्सी.च्या परीक्षेत अयशस्वी झाले होते. १९५४ साली श्रीबाबांचे महानिर्वाण झाले. त्यानंतर चिमाताई सासरहून वर्ध्याहून पुण्याला आल्या होत्या. त्यांनी श्रीबाबांची पुस्तके आणि पंचांगे असलेली ट्रंक, एक प्रवासात न्यायचा फिरकीचा तांब्या आणि एक टिफिन कॅरिअर अशा तीन वस्तू शरदरावांना दिल्या. ट्रंकेवरती बाबांच्याच हस्ताक्षरात 'पुस्तके आणि पंचांग' असे लिहिलेले होते. हा श्रीबाबांनी दिलेला प्रसादच होता. कारण त्यानंतर पुढील वर्षी शरदराव उत्तम तऱ्हेने परीक्षा उत्तीर्ण झाले आणि त्यांची शैक्षणिक कारकीर्द सातत्याने मोठ्या उंचीवर पोहोचली. तसेच देशभर आणि जगभर भरपूर प्रवासही झाला. आपल्या यशाच्या पाठीमागे श्रीबाबांचे आशीर्वाद आहेत अशीच शरदरावांची भावना होती. कधीही करिअरमध्ये अडचण आली तर अनपेक्षितपणे त्यातून मार्ग निघायचा. अशी अनेक उदाहरणे शरदरावांनी त्यांच्या २०१२ साली सहस्रबुद्धे समाधिमंदिरात झालेल्या प्रकट मुलाखतीत सांगितली आहेत.



*राजगुरू सरांचा श्रीसहजानंदसरस्वती सेवा मंडळाच्या वतीने श्री. विकासराव वालावलकर यांच्या हस्ते भव्य सत्कार, उजवीकडे डॉ शीला मिश्रा*

१९८४ साली कॅनडाला एका कॉन्फरन्ससाठी निमंत्रण आले होते. दिल्लीला जाऊन त्यासाठी व्हिसा घ्यायचा होता. पण पुण्यातच स्टेशनवर रिक्षात बॅग हरवली आणि पासपोर्टपासून सगळी कागदपत्रे हरवली. केवळ आठ दिवसात नवा पासपोर्ट बनविण्याच्या प्रक्रियेत पावलोपावली असंख्य अडचणी येत गेल्या आणि त्यांचे निराकरण आश्चर्यकारकपणे होत गेले आणि राजगुरू अगदी वेळेत कॅनडाला पोहोचले. केवळ श्रीबाबांची 'आपल्या शऱ्यावर' सदैव कृपादृष्टी असल्यामुळेच हे शक्य झाले असे त्या वेळी शरदरावांनी सांगितले.


''वृद्धावस्थेत 'संध्याछाया' भिववू लागतात. अशा वेळी माणूस शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या हतबल होतो. परंतु मी जेव्हा या मंदिरात येतो तेव्हा ती भीती निघून जाते. मनात नवी उमेद निर्माण होते आणि अजून निसर्गाचा शोध घ्यावा असे तीव्रपणे वाटते आणि मी पुन्हा माझ्या कामात गढून जातो. मी माझा ईश्वर वाळूच्या कणात पाहण्याचा सदैव प्रयत्न केला आणि श्रीबाबांच्या कृपेनेच थोडेफार काम मी करू शकलो.'' अशा भावना शरदरावांनी त्या मुलाखतीच्या शेवटी व्यक्त केल्या होत्या.

५ नोव्हेंबर २०१७ रोजी श्रीबाबामहाराजांच्या जयंती उत्सवात राजगुरू सरांचा श्रीसहजानंदसरस्वती सेवा मंडळाच्या वतीने भव्य सत्कार करण्यात आला होता. त्या वेळी डॉ. शीला मिश्रा या सरांच्या विद्यार्थिनीने मुद्दाम उपस्थित राहून सरांच्या संशोधनकार्याचे महत्त्व श्रोत्यांना समजावून सांगितले होते.

श्रीबाबांना पाहण्याचे, श्रीबाबांच्या सहवासात राहण्याचे, त्यांचा हात पाठीवर फिरण्याचे महद्भाग्य लाभलेले शरदराव राजगुरू यांच्या निधनाने एका पर्वाचीच समाप्ती झालेली आहे. श्रीबाबांना प्रत्यक्ष पाहिलेला शेवटचा माणूस काळाच्या पडद्याआड गेला आहे.

श्रीसद्गुरू बाबामहाराज सहस्रबुद्धे आणि श्रीसद्गुरू सहजानंदसरस्वती स्वामी महाराज यांच्या समस्त शिष्यपरिवारातर्फे या थोर ज्ञानतपस्व्याला ही आदरांजली!

## विद्यार्थ्यांवर जिवापाड प्रेम करणाऱ्या डॉ. राजगुरू यांच्या रोजनिशीतील एक पान



एकूणच - डॉ. हेमाची आयुष्यातील सर्व-
अर्थाने प्रगती झालेली पाहताना आनंद होत होता.
लवकर रागवणारी पण तितकीच प्रेमळ आणि
धडपडणारी हेमा आयुष्यात यशस्वी झाल्याचे
पाहून खूप समाधान झाले. डॉ. अच्युथन -
एका कंपनीचे चेअरमन, कलकत्त्याहून Business
Management केलेले - एक हुशार-समंजस
अय्यंगार ब्राह्मण पाहून होतो. माझ्या आणि
हेमाच्या वयात २५ वर्षांचे अंतर आहे -
त्याचीपण जाणीव होते. Computer च्या युगात
वाढणारी ही पिढी पाहताना खूप वेगळे वाटते परंतु
दडपण व्हावे आणि शिकायला सुरवात करावी-
शिक्षण-संशोधन हे न संपणारे असते-सागरा-
सारखे अथांग - ह्याची जाणीव ह्यावेळेस
हेमाशी बोलताना सतत होत होती.
~~असो~~ हेमा चटकन रागवणारी आहे पण
तितकीच प्रेमळ. हे मी गेली २५ वर्षे अनुभवत
आहे. मला वडिलांसारखी मानणारी आता खूप
जग पाहिलेली - वयाच्या ५२ व्या वर्षी प्राध्यापक
झाली आहे. माझ्या सगळ्या विद्यार्थी वर्गाची
प्रगती पाहत असताना खूप समाधान वाटते.
ईश्वराजवळ एकच प्रार्थना - हे प्रेम देणारे शिष्य
आयुष्यात असेच पुढे जावोत !

रविवार दि. १८ डिसेंबर २०२२ रोजी श्रींचे स्थानात श्री सद्गुरू वासुदेवानंत सरस्वती सेवा मंडळाची शोकसभा घेण्यात आली व त्यात कै. डॉ. शरदराव राजगुरू यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

*''श्री. शरदराव राजगुरू यांचे अल्पशा आजाराने व वार्धक्याने, १४ डिसेंबर २०२२ रोजी देहावसान झाले. ही अतीव दुःखद घटना घडली. श्री. शरदराव राजगुरू हे एक आंतरराष्ट्रीय कीर्तीचे पुरातत्व शास्त्रज्ञ होते. अशा या महान शास्त्रज्ञाच्या पडद्याआड होण्याने देशाने एक अत्यंत अनुभवी पुरातत्व शास्त्रज्ञ गमावला आहे. आपल्यातील हे एक महान व्यक्तिमत्व, ज्यांना श्री बाबा महाराजांचा सहवास लाभला होता, ते हरपले आहे. व्यक्ती म्हणून श्री. शरदराव इतके मोठे असूनही अत्यंत विनयशील, प्रेमळ, शांत, सुस्वभावी आणि मोठेपणाचा किंचितही गर्व नसणारे आदरणीय व्यक्तिमत्व होते. काही वेळा गुरुकृपा मध्ये त्यांना भेटण्याचा योग कित्येकांना*

भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत लक्ष्मण वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र
श्रीक्षेत्र डेरवण - ४१५ ६०६, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी
दूरध्वनी : Reception No. (Hospital) : 8847790149 MSW (Social worker) : 9356427731
ई-मेल : info@walawalkarhospital.com वेबसाईट : www.walawalkarhospital.com

*आला, त्यांनी हे अनुभवले आहे. त्यामुळे ते सर्वांना आपलेसे वाटायचे.*

*श्री शरदराव ह्यांनी, पुणे विद्यापीठातून १९६० साली भू-विज्ञान शास्त्राची एम. एस्सी. पदवी संपादन केली. त्यानंतर ते डेक्कन कॉलेज मध्ये 'व्याख्याता' म्हणून रुजू झाले. कामाची आवड, विषयाचे उत्तम ज्ञान आणि तीव्र ज्ञानलालसा यातून त्यांची वेगाने प्रगती झाली ती आंतर- राष्ट्रीय स्तरापर्यंत. ते इंटरनॅशनल युनियन फॉर क्वाटर्नरी रिसर्च या संस्थेचे आजीव सदस्य झाले. एशियाटिक सोसायटीच्या सुवर्ण पदकाचे मानकरी आणि नॅशनल अकादमी ऑफ सायन्सेस चे निवडलेले सभासद होते. जिओ आर्किओलॉजी या आंतरराष्ट्रीय नियतकालिकेचे संपादकत्व त्यांना लाभले होते. या काही मासलेवाईक उदाहरणा व्यतिरिक्त त्यांचे फार मोठे कार्य आणि त्यांच्या यशस्वीतेची पदके हि असंख्यात आहेत. हे कार्य सुरु असतानाच मुळा- मुठा नद्यांच्या प्लाइस्टोसीन काळातील निक्षेपांचा इतिहास हा प्रबंध सादर करून त्यांनी डॉक्टरेट ही पदवी मिळवली. राजस्थानातील महत्वाची उत्खनने, दख्खनच्या पठारावरील मोठ्या नद्या व त्यांच्या उप-नद्या यांच्या खोऱ्यातील भू-पुरातत्वीय संशोधन ह्या त्यांच्या कार्यातील महत्वपूर्ण घटना होत्या. एकूणच त्यांच्या कार्यातील आणि निष्कर्षातील अचूकपणा हे त्यांचे वैशिष्ट्य होते. त्यांच्या या कार्याचा डेक्कन कॉलेजला खुप फायदा झाला. तिथे प्रागैतिहासिक संशोधनाचे नवीन दालन त्यांच्या कार्यामुळे सुरु झाले. नव्वदीच्या वयातही त्यांचा या कार्यातील उत्साह आणि नवीन संशोधकांना मार्गदर्शन हे थक्क करणारे होते.*

*असा हा माणूस आपल्यात इतक्या साधेपणाने मिसळून राहत असे कि त्यामुळे त्यांची थोरवी आपण समजू शकलो नाही. श्री शरदराव आज आपल्यात नाहीत, पण आपण अभिमानाने सांगू शकतो कि या आंतरराष्ट्रीय संशोधक शास्त्रज्ञाचा थोडासा का होईना सहवास आम्हाला लाभला आहे.*

*त्यांच्या निधनाने त्यांच्या कुटुंबावर व परिवारावर दुःखाचे संकट कोसळले आहे. या दुःखद प्रसंगी आपण सर्वजण त्यांच्या बरोबर आहोत आणि त्यांच्या दुःखात सहभागी आहोत. कै. श्री. शरदरावांच्या आत्म्यास उत्तम गती प्राप्त होवो या साठी आम्ही सर्वजण, श्री बाबा महाराज सहस्त्रबुद्धे आणि श्री सहजानंद सरस्वती महाराज यांचे चरणी प्रार्थना करीत आहोत.*

***विनायक चिंतामण पराडकर***
*अध्यक्ष*
*श्री सद्गुरू वासुदेवानंत सरस्वती सेवा मंडळ,पुणे*

श्रीक्षेत्र डेरवण वार्तापत्र हे मासिक मालक, मुद्रक, प्रकाशक : श्री. विकासराव वालावलकर यांनी श्रीमुद्रा, १८१, शुक्रवार पेठ, पुणे - ४११ ००२ (महाराष्ट्र) येथे छापून भ.क.ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र, श्रीक्षेत्र डेरवण, मु.पो. डेरवण, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी ४१५ ६३९ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले आहे.
कार्यकारी संपादिका : डॉ. सौ. सुवर्णा पाटील - ९९२१२ ५१६९५,
उपसंपादक : सौ. शरयू यशवंतराव - ९८८१६ १९९७४, श्री. श्रीकांत पराडकर - ९५८८४ ७९२२०